

# डॉ. शंकरराव चव्हाण सूक्ष्मअध्यापन कौशल्य व्हिडीओ सादरीकरण राज्यस्तरीय स्पर्धा (2021 – 22)

श्री.शारदा भवन एज्युकेशन सोसायटी नांदेड संचलित अध्यापक महाविद्यालय नांदेड यांच्या वतीने दरवर्षी राज्यस्तरीय सूक्ष्माध्यापन स्पर्धा आयोजित केली जाते पण कोविडच्या पार्श्वभूमीवर या स्पर्धेत खंड पडला असून यावर्षी ही स्पर्धा व्हिडिओच्या माध्यमातून व्हर्च्युअल प्लॅटफॉर्मवर घेण्याचे ठरले आहे..

२०२१ ते २२ या शैक्षणिक वर्षासाठी डॉ. शंकरराव चव्हाण सूक्ष्म अध्यापन कौशल्य व्हिडीओ सादरीकरण राज्यस्तरीय स्पर्धा आयोजित करण्यात येत आहे. ही स्पर्धा **व्हर्च्युअल प्लॅटफॉर्म म्हणजेच व्हिडीओ** या माध्यमाद्वारे घेण्यात येणार आहे.. या स्पर्धेसाठी प्रत्येक महाविद्यालयातून पाच विद्यार्थ्यांचा संघ भाग घेऊ शकेल.

**प्रत्येक कौशल्यासाठी एक विद्यार्थी** याप्रमाणे **फक्त पाच विद्यार्थी भाग घेऊ शकतील** किंवा कोणत्याही कौशल्यासाठी **पाचपेक्षाही कमी विद्यार्थी भाग घेऊ शकतील..**

## स्पर्धेसाठीचे नियम:

१. स्पर्धेसाठी कोणतीही प्रवेश फी नाही. तसेच स्पर्धा ही मराठी व इंग्रजी या दोन्ही माध्यमातून घेतली जाईल. या स्पर्धेत खालील पाच कौशल्यासाठी भाग घेता येईल. पण एका विद्यार्थ्याला कोणत्याही एकाच कौशल्यासाठी आपले नाव पाठविता येईल. ती कौशल्ये पुढीलप्रमाणे:

**अ. प्रस्तावना कौशल्य**
**ब. चेतकबदल कौशल्य**
**क. स्पष्टीकरण कौशल्य**
**ड. दृक्-श्राव्य साधनांचा वापर कौशल्य**
**ई. फलकलेखन कौशल्य**

२. स्पर्धेसाठी निकाल जाहीर झाल्यानंतर बक्षिसे दिली जातील. बक्षीसवितरण समारंभात ही बक्षिसे मान्यवरांच्या हस्ते दिली जातील. ती खालील प्रमाणे :

प्रथम विजेता स्पर्धक : १००१ रुपये
द्वितीय विजेता स्पर्धक : ७५१ रुपये
तृतीय विजेता स्पर्धक : ५०१ रुपये

वरील बक्षिसे प्रत्येक कौशल्यासाठी जर कमीत कमी १५ पेक्षा जास्त स्पर्धक असतील तरच कौशल्यानुसार वेगळी बक्षिसे दिली जातील. अन्यथा सर्व कौशल्यांमधून तीन स्पर्धकांचीच बक्षिसांसाठी निवड केली जाईल. यासंदर्भात निर्णय घेण्याचा अंतिम अधिकार महाविद्यालय प्रशासनाचा असेल..

३. तसेच प्रत्येक सहभागी विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेऊन आपले कौशल्य सादर केल्याबद्दल ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येईल.

४. स्पर्धकांवर परीक्षकांचा निकाल बंधनकारक राहील. त्याबाबत कोणत्याही तक्रारी वा सबबी गृहीत धरल्या जाणार नाहीत. स्पर्धेसाठी खालील निकषांचा उपयोग केला जाईल. ते निकष पुढीलप्रमाणेरू

**अ..कौशल्यासाठी आशयाची निवड**
**ब. व्हिडीओची क्वालिटी**
**क. संबंधित कौशल्याचे पाठटाचण**
**ड. कौशल्याचे सादरीकरण**
**ई. कौशल्यातील उपकौशल्यांची मांडणी व प्रभाव**

५. स्पर्धेसाठी स्पर्धकाने आपल्या सूक्ष्म अध्यापन व्हिडिओ दिलेल्या सूचनांनुसार व कौशल्यावर आधारीत तयार करावयाचा आहे

६. स्पर्धेसाठी पाठविलेले टाचण स्वत: तयार केलेले असावे. इतर प्रकाशित वा दुस-याचे कॉपी केलेले टाचण चालणार नाही. तसे आढळल्यास संबंधित स्पर्धकाला स्पर्धेतून बाद केले जाईल.

७. स्पर्धेसाठी पाठविलेले टाचण प्रकाशित करण्याचा अधिकार (कॉपी राईट) महाविद्यालय प्रशासनाकडे राखून ठेवला आहे. त्याबाबत कोणतीही तजवीज केली जाणार नाही.

८. प्रत्येक महाविद्यालयातून किमान पाच विद्यार्थी एका कौशल्यासाठी एक याप्रमाणे पाच किंवा पाचपेक्षा कमी विद्यार्थी पाठविता येतील. प्रत्येक स्पर्धकान आपल्या कौशल्याचा वेगळा व्हिडीओ पाठवावा. एकत्र संघ म्हणून पाठवू नये. तसे महाविद्यालयाच्या प्राचार्यांचे पत्र प्रत्येक विद्यार्थ्याने Pdf स्वरूपात व संबंधित कौशल्याचे पाठटाचण (स्वहस्ताक्षरातील किंवा संगणकीय टाईप केलेले) Colour pdf स्वरूपात सोबत पाठवावे..

९.. व्हिडीओमध्ये सुरुवातीला विद्यार्थी व त्याच्या महाविद्यालयाची माहिती, कौशल्याचे नाव व संबंधित कौशल्याचे पाठ टाचण सादर करण्यासाठी पहिली दीड मिनिटे देण्यात आली आहेत. (नमुना पाठ टाचण कसे असावे याबाबत चेतकबदल कौशल्याच्या पाठाचे नमुना टाचण देण्यात आले आहे.) त्यानंतर पाच ते सहा मिनिटांचा संबंधित कौशल्याचा व्हिडिओ सादर केलेला असणे आवश्यक आहे. संबंधित व्हिडीओ खाली दिलेल्या गुगल क्लासरूमच्या लिंकवर पाठवावा :.

https://classroom.google.com/c/NDQyNTQwODk5OTA1?cjc=qyxfuus

१०. स्पर्धेसाठी व्हिडीओ पाठविण्याची अंतिम तारीख **१५ जानेवारी २०२२** ही असेल. **१५ जानेवारीनंतर आलेल्या व्हिडीओंचा स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.**


**प्राचार्य**

**डॉ. अनुराधा राऊत**

**9421756169**



**माहितीसाठी संपर्क :**

१. प्रा. एम.आर. जोशी 9890438493

२. प्रा. डॉ संजीवनी चव्हाण 91759444460

३. प्रा. डॉ विशाखा म्हस्के 9890850161

४. श्री. राम कदम 9545395486

डॉ. शंकरराव चव्हाण राज्यस्तरीय सूक्ष्माध्यापन कौशल्य व्हिडीओ सादरीकरण स्पर्धेसाठी एक नमुना पाठटाचण

श्री शारदा भवन एज्यूकेशन सोसायटीचे

# अध्यापक महाविद्यालय, नांदेड

## सूक्ष्म अध्यापन कौशल्य : चेतकबदल

वर्ग: 7 वा | विषय : इतिहास | वेळ: 5 ते 7 मिनिटे

घटक: प्रतापगडावरील भेट


सादरीकरण ~ प्रा. एम. आर. जोशी


| | शिक्षक व विद्यार्थी कृती | उपघटक |
|---|---|---|
| शिक्षक | महाराष्ट्रातील किल्ल्यांची नावे सांगा. | *विद्यार्थ्यांचा शाब्दिक सहभाग* |
| विद्यार्थी | रायगड, प्रतापगड, तोरणागड, कोंढाणा इत्यादी | |
| शिक्षक | छान ! तर या प्रतापगडावर कोणती महत्त्वाची घटना घडली? | |
| विद्यार्थी | प्रतापगडावर अफजलखानाची भेट ही महत्वाची घटना घडली. | |
| शिक्षक | तर आज आपण *प्रतापगडावरील भेट* या पाठातून अफजलखानाचा वध याविषयी माहिती पाहू. ( शिक्षक फलकावर पाठाचे शीर्षक लिहितात.) | *शिक्षक हालचाल व संवेदन लक्ष्यात बदल* |
| विद्यार्थी | शिवाजी महाराजांच्या पराक्रमाने अवघा महाराष्ट्र ढवळून निघाला होता. त्यातच विजापूरच्या बादशहाची छत्रपती शिवाजी महाराजांच्या या पराक्रमामुळे झोप उडाली. विजापूरच्या दरबारात शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी सभा भरवली होती. त्या सभेत धिप्पाड अशा अफजलखानानं शिवाजी महाराजांना पकडण्यासाठी विडा उचलला व द्वेषाने फुत्कारला *" कोण शिवाजी? त्याला मी जिंदा या मुर्दा नाही पकडला तर नावाचा सरदार नाही."* ( शिक्षक शिवाजी महाराजांचा पोवाडा ऐकवतात.) | *शिक्षक हावभाव व आवाजात चढउतार* |
| शिक्षक | शिवाजी महाराजांना आपली रयत म्हणजे स्वत:च्या लेकरासारखी होती. त्यातच या अफजलखानाच्या राज्यावर चालून आलेल्या संकटामुळे रयत भयभीत झाली होती. रयतेवरील त्याच्या अन्याय अत्याचारांच्या बातम्या शिवाजी महाराजांच्या कानावर येत होत्या. त्यामुळे महाराज अस्वस्थ झाले आणि त्यांनी अफजलखानाला नाईलाजाने प्रतापगडावर भेटीचे निमंत्रण दिले.<br>शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या भेटीसाठी प्रतापगडच का निवडला असेल? | *शिक्षक हावभाव व आवाजात चढउतार* |
| विद्यार्थी | कारण प्रतापगड दुर्गम असा होता. खानाच्या सैन्याला त्या प्रतापगडाची पुरेशी माहिती नव्हती. पण शिवाजी महाराजांच्या मावळ्यांना त्या प्रतापगडाची खडा न खडा अशी माहिती होती. म्हणून भेटीसाठी प्रतापगडाची निवड करण्यात आली होती. | |
| शिक्षक | उत्तम !<br>भेटीच्या दिवशी शिवाजी महाराज निघाले अगोदर त्यांनी जय्यत तयारी केली अंगामध्ये चिलखत, पोटाजवळ वाघनखे, कंबरेला बिचवा, डोक्यावर जिरेटोप परिधान केला<br>(शिक्षक चित्र दाखवून विद्यार्थ्याला त्यातील नावे सांगण्यास सांगतात.)<br>शिवाजी महाराजांनी माँ जिजाऊंची भेट घेतली, त्यांचा आशीर्वाद घेतला आणि भवानी मातेच्या मंदिराकडे त्यांनी कूच केली. ( शिक्षक घोड्यांच्या टापांचा व | *विद्यार्थ्यांचा शारिरीक सहभाग*<br><br>*संवेदन लक्ष्यात बदल* |

| | शिक्षक व विद्यार्थी कृती | उपघटक |
|---|---|---|
| शिक्षक | मंदिराच्या घंटेचा आवाज विद्यार्थ्यांना ऐकवितात) प्रतापगडावर भेटीसाठी भव्य असा शामियाना उभारला होता. शिवाजी महाराजांना पाहताच धिप्पाड असा अफजलखान त्यांना सामोरे गेला आणि म्हणाला, *आओ शिवाजी गले मिले!* (शिक्षक शिवाजी महाराजांच्या भेटीचे चित्र दाखवितात.) शिवाजी महाराजांना धिप्पाड अशा खानाने मगरमिठी मारली. खान दगाबाज होता. या दगाबाज खानाने एका हाताने शिवाजी महाराजांना मिठीत पकडून त्यांच्या पाठीवर तलवार चालवली. शिवाजी महाराजांनी खानाचा दगा ओळखला चिलखत घातल्यामुळे शिवाजी महाराज बचावले. अत्यंत चपळाईने वाघनखे काढून खानाच्या पोटात खुपसली व बिचव्याने त्याच्या पोटात सपासप असे वार केले. खान दगा **ऽ** दगा **ऽऽ** म्हणत खाली कोसळला खानाचा अंगरक्षक शिवाजी महाराजांवर धाऊन आला, तेव्हढयात जिवा महालाने त्या अंगरक्षकाचा बंदोबस्त केला म्हणून इतिहासात कोणती म्हण प्रसिद्ध झाली? | *शिक्षक हावभाव व आवाजात चढउतार*<br><br>*शिक्षक हालचाल व हावभाव* |
| विद्यार्थी | *होता जिवा म्हणून वाचला शिवा.* | |
| शिक्षक | अशाप्रकारे शिवाजी महाराजांनी खानाचा बंदोबस्त केला.<br>तर अशाप्रकारे आज आपण *प्रतापगडावरील भेट* या पाठातून अफजलखानाच्या वधाविषयी माहिती मिळविली. | |

# पाठात वापरलेली शैक्षणिक साधने







## Sound Effects

Sound of Horse footsteps:

https://youtu.be/CqFOZhbvRV4

Sound of Powada:

https://youtu.be/xBNe0ICLbIU

Sound of Ghantanad:

https://youtu.be/uLcfRbOysII